मुख्यमंत्री ग्रामसडक योजना
अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना यांचे अध्यक्षतेखाली योजनेच्या कामासाठी समिती गठीत करणेबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः मुग्रायो २०१६/प्र.क्र.१२/पंरा-७
बांधकाम भवन, ७ वा मजला,
२५ मर्झबान, फोर्ट,
फोर्ट, मुंबई ४०० ००१
तारीख: ०२ फेब्रुवारी, २०१६

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक ग्रासयो-१०१५/प्र.क्र.१२/योजना-९,दिनांक २८/१०/२०१५

परिपत्रक

महाराष्ट्र राज्यातील न जोडलेल्या वाडया-वस्त्या जोडण्यासाठी व ग्रामीण भागातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सुरु करण्याचा धोरणात्मक निर्णय संदर्भिय शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंमलबजावणीसाठी रस्त्यांचे कोअर नेटवर्क तयार करणे, रस्त्यांचा प्राधान्यक्रम ठरविणे, सविस्तर प्रकल्प अहवाल, प्रारुप निविदा इत्यादींची तपासणी करुन वेळोवेळी शासनास सादर करावयाची आहेत. यासाठी अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे समिती नियुक्त करण्यात येत आहे.

१)	अधिक्षक अभियंता, प्रमंग्रासयो (संबंधित विभाग)	अध्यक्ष
२)	राज्य गुणवत्ता निरिक्षक, प्रमंग्रासयो (नियुक्त)	सदस्य
३)	कार्यकारी अभियंता, प्रमंग्रासयो (संबंधित जिल्हा)	सदस्य-सचिव

वरील समितीमध्ये जिल्हानिहाय राज्य गुणवत्ता निरिक्षकांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	राज्य गुणवत्ता निरिक्षकांचे नाव	दर्जा	जिल्हा
१	श्री.जे.टी.छाबरा	१	ठाणे,रायगड,पालघर
२	श्री.(डॉ) सुनिल कुटे	१	धुळे
३	श्री.बी.जी.भामरे	१	नंदुरबार
४	श्री.एस.सी.चौधरी	१	नागपूर,वर्धा
५	श्री.एस.एल.लोहकरे	१	भंडारा,चंद्रपूर
६	श्री.एस.जी.जोशी	१	सोलापूर
७	श्री.जी.बी.ढाकणे	१	औरंगाबाद
८	श्री.एस.जी.घडसे	१	अमरावती,यवतमाळ
९	प्रो.श्री.पी.टी.कडवे	१	नांदेड
१०	श्री.डी.जी.पावसे	१	पुणे
११	श्री.के.डी.डोईफोडे	१	नाशिक,जळगांव
१२	श्री.पी.आर.किर्ती	१	परभणी,लातूर
१३	श्री.आर.ए.डोरले	१	उस्मानाबाद
१४	श्री.बी.जी.भिंगारदिवे	२	सातारा
१५	श्री.पी.जी.खोंडे	२	गोंदिया,गडचिरोली
१६	श्री.ए.वाय.गुंजाळ	२	बीड,बुलढाणा
१७	श्री.डी.एस.अंभोरे	२	अकोला,वाशिम
१८	श्री.आर.व्ही.साहू	२	रत्नागिरी,सिंधुदुर्ग
१९	श्री.ए.एस.शिखरे	२	अहमदनगर
२०	श्री.आर.एस.पाटील	१	सांगली,कोल्हापूर
२१	श्री.एस.पी.किवळेकर	१	जालना,हिंगोली

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेसंदर्भात जिल्हानिहाय तयार केलेले प्रस्ताव/माहिती शासन/सक्षम समितीकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावयाचे दस्तऐवज वेळोवेळी वरील प्रमाणे नियुक्त जिल्हानिहाय समितीने तपासणी करुन मान्यता देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. राज्य गुणवत्ता निरिक्षक यांना प्रचलित दराने मानधन व इतर भत्ते देय राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०२१२३०४८१६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Raghunath A Nagargoje

Digitally signed by Raghunath A Nagargoje
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Raghunath A Nagargoje
Date: 2016.02.02 18:23:52 +05'30'

(र.आ.नागरगोजे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
२) मा. प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) बांधकाम भवन, ७ वा मजला,२५ मर्झबान पथ मुंबई ४०० ००१
३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२,नागपूर
४) महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२,नागपूर
५) मुख्य अभियंता, प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, कॅम्प ऑफीस पुणे
६) उप सचिव (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) बांधकाम भवन, ७ वा मजला,२५ मर्झबान पथ मुंबई ४०० ००१
७) अधिक्षक अभियंता, प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था (सर्व विभाग)
८) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
९) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
१०) कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था (सर्व जिल्हे)
११) निवड नस्ती, पंरा-७, ग्राम विकास विभाग.